महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०५ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३३७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# मुंबई महापालिकेसाठी महायुतीची मोर्चेबांधणी

## मुंबईत भाजप; ठाण्यात शिवसेना मोठा भाऊ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई: विधानसभा निवडणुकीत नेत्रदीपक कामगिरी करत प्रचंड बहुमत मिळवणाऱ्या महायुतीनं आता स्थानिक स्वराज्य संस्थांची तयारी सुरु केली आहे. मुंबई, ठाणे आणि पुणे महापालिका निवडणुका महायुतीमधील घटकपक्ष स्वबळावर लढणार का, याबद्दल उत्सुकता आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी गेल्याच महिन्यात राज्याचा दौरा करत स्वबळावर निवडणूक लढण्यासाठी तयारीचा आढावा घेण्याच्या सूचना दिल्या. पण आता भाजपनं महायुतीत निवडणुका लढवण्याच्या दृष्टीनं तयारी केली आहे. या परिस्थितीत जागावाटपात तिन्ही पक्षांचा कस लागणार आहे.

मुंबई महानगर पालिका निवडणुकीच्या जागावाटपात भारतीय जनता पक्ष मोठा भाऊ असेल, तर शिवसेना लहान भाऊ असेल, अशी सुत्रांची माहिती आहे. तर ठाण्यात उलट परिस्थिती असेल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात शिवसेना मोठा भाऊ असेल. तर भाजप कमी जागा लढवून धाकटा भाऊ होईल. मुंबईत शिंदेंनी उद्धव ठाकरेंच्या पक्षाला सुरुंग लावत ४० हून अधिक नगरसेवक गळाला लावले आहेत. त्यामुळे ठाकरे बॅकफूटवर गेले आहेत. पण तरीही मुंबईत शिंदेंना अपेक्षित जागा मिळण्याची शक्यता कमीच आहे.



मुंबई महानगरपालिकेत एकूण २२७ प्रभाग आहेत. २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत एकसंध शिवसेनेनं ८४, तर भाजपनं ८२ जागांवर मजल मारली. त्यावेळी दोन्ही पक्ष स्वतंत्र लढले होते. निवडणुकीनंतर ४ अपक्ष नगरसेवकांनी सेनेत प्रवेश केला. मनसेचे ६ नगरसेवक सेनेनं गळाला लावले. त्यामुळे नगरसेवकांचा आकडा ९४ वर पोहोचला. २०२२ मध्ये पाच वर्षांची टर्म संपवण्यापूर्वी झालेल्या पोटनिवडणुकीत सेनेनं ५ जागा जिंकल्या. त्यामुळे नगरसेवकांचा आकडा ९९ वर गेला.

अमित शहा मुंबई दौऱ्यावर असताना एकनाथ शिंदेंनी त्यांची भेट घेतली. मुंबई महापालिकेसाठी त्यांनी १०७ जागांची मागणी केली. पण शहांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. मुंबईत भाजप नगरसेवकांची संख्या अधिक असल्यानं पक्ष १५० जागांसाठी आग्रही आहे. पक्षफुटीनंतर सेनेचे ४४ नगरसेवक शिंदेंकडे गेले. तर ५५ नगरसेवक अद्याप ठाकरेंसोबत आहेत. त्यामुळे शिंदेंना १०७ जागा सोडण्यास भाजप तयार नाही. १५० हून अधिक जागा लढवून मुंबई महापालिकेत भाजपचा महापौर करण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे.

# ... अन्यथा महावितरण कार्यालयाला टाळे !

## - शहापूर शिवसेनेचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर :: राजेश जागरे

तालुक्यात अनेक महिन्यांपासून कोणत्या ना कोणत्या भागात तासनतास वीज नसणे, महावितरणच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांकडून वीज ग्राहकांना योग्य प्रतिसाद न देणे,लाईट असली तरी ती डीम असणे, सतत ट्रान्सफार्मर नादुरुस्त होणे, अवाजवी बिल येणे,कर्मचारी लाईट गेल्यावर कधीच जागेवर नसणे या घटनांमध्ये १५ दिवसांत सुसूत्रता न आल्यास शहापूर वीज वितरण कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने आज दिला.यावेळी शहर प्रमुख विजय देशमुख,काशिनाथ तिवरे, रश्मी निमसे,महीला जिल्हाप्रमुख पूनम चंदे,उपशहर प्रमुख बाळा निमसे,तालूका समन्वयक गणेश अवसरे,डॉ.अतुल पोतदार यांसह शहापूर वीज वितरणचे उपअभियंता योगेश इंगळे उपस्थित होते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शहापूर शहर शाखेतर्फे शहापूर शहरात वेळोवेळी खंडीत होणारा विजपूरवठा व भरमसाठ येणारी लाईट बिल यासाठी बैठक आयोजीत केली होती.यावेळी शहापूर शहरात एकूण किती ट्रान्सफार्मर आहेत,शहापूर शहरासाठी व आपल्या भागातील कर्मचारी कीती आहेत,वर्षभरात कीती दुरुस्तीची कामे केली,सदर कामे कोणत्या एजन्सीला दिली, वर्षभरात किती विद्युत पोल व विद्युत वाहिन्या बदलल्या,शहापूर शहरात नविन झालेल्या किती इमारतींना ट्रान्सफार्मर बसवले. याची माहीती मागीतली.

तसेच अपूरा असलेली कर्मचारी संख्या वाढवण्यासाठी सूचना दिली.तथापि ट्री कटिंगची कामे पावसाळ्यापूर्वी करण्याची पध्दत बंद करून दर सहा किंवा तीन महिन्यांनी झाडे कटीग करावी त्यामुळे नैसर्गिक आपत्ती ओढवणार नाही. कमी दाबाच्या ट्रान्सफार्मरच्या जागी जास्त क्षमतेचे ट्रान्सफार्मर लावण्यात याव्या व जून्या विद्युत वाहिन्या बदलण्याची कामे लवकारात लवकर करावी. तसेच यापूढे वीज खंडीत होण्याचे प्रकार झाल्यास विद्यूत मंडळावरच गुन्हा दाखल करावा असे ठरविण्यात आले.





## थोडक्यात महत्वाचे

# तासभर पाऊस कल्याणकरांची तारांबळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. ४ :** तासभर पडलेल्या पावसाने कल्याण-डोंबिवली परिसरातील अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेल्याचे बुधवारी (ता. ४) पाहायला मिळाले. नव्याने तयार केलेल्या सिमेंटच्या रस्त्यांवर पाणी साचत असल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. कल्याणमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच डोंबिवली मधील ९० फिट रोड, रेल्वे समांतर रस्ता, शिवम हॉस्पिटलसमोरील रस्ता आदी अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले होते. या साचलेल्या पाण्यातून वाट काढताना नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. पावसास आता कोठे सुरुवात झाली आहे. अवघा काही वेळ पडलेल्या पावसाने सगळीकडे पाणी साचत आहे. ज्या भागात रस्त्यांची काँक्रीटीकरणाची कामे झाली आहेत, त्या रस्त्यांवर पाणी साचत असल्याचे दिसून येत आहे. खड्डयांतून नागरिकांची सुटका झाली असली तरी साचलेल्या पाण्यातून नागरिकांना वाट काढावी लागत आहे.

# शहापूर जवळील डोळखांब परिसरात बिबट्याचा वावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर दि. ४ :** ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यातील डोळखांब या सह्याद्री डोंगर रांगेच्या परिसरातील डेहणे, गुंडे गाव परिसरातील जंगलामध्ये दोन दिवसांपासून वन विभागाच्या अधिकाऱ्यांना बिबट्याचा वावर आढळून आला आहे. डोळखांब परिसरातील बहुतांशी गावे, आदिवासी पाडे डोंगर रांगांच्या पायथ्याशी घनदाट जंगलात आहेत. बिबट्यापासून नागरिकांनी स्वसंरक्षण कसे करावे. पशुधनाची सुरक्षितता कशी घ्यावी, याविषयी डोळखांब वन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी गावे, आदिवासी पाड्यांमध्ये जाऊन जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

ठाणे जिल्ह्याचे शेवटचे टोक म्हणून डोळखांब परिसर ओळखला जातो. त्याच्या बाजुला अकोला, भंडारदरा, घाटघर प्रकल्प आणि या डोंगर रांगांच्या पलीकडे अहिल्याबाई नगर जिल्ह्याची हद्द लागते. डोळखांब भागात डेहणे गाव हद्दीत आज्या डोंगर रांगांमध्ये वाल्मिक ऋषींच्या समाधीचे स्थान, लवं-कुश यांच्या पाळण्यांचे ठिकाण असल्याचे सांगण्यात येते. अनेक पर्यटक, भक्तगणांची या भागात नियमित वर्दळ असते.

# रस्ते खोदकामांमुळे बदलापुरातील नागरिक त्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर (बातमीदार)** बदलापूर शहरात रस्त्याच्या खोदकामांचा त्रास नागरिकांना होत असून, बेलवली येथील भुयारी मार्गाच्या रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्यामुळे, या खोदकामात पाण्याच्या जलवाहिनी फुटल्या गेल्या आहेत. परिणामी गेल्या सहा दिवसांपासून या परिसरातील रहिवाशांच्या घरात नळाला पाणीच आलेले नाही. त्यामुळे आमच्या घरात जोपर्यंत पाणी मिळत नाही तो पर्यंत आम्ही रस्त्याचे काम होऊ देणार नाही, असा इशारा येथील रहिवाशांनी दिला आहे.

बदलापूर पश्चिमेकडील बेलवली येथील भुयारी मार्ग जो पूर्वेकडून पश्चिमेला जोडला जातो, या भुयारी मार्गात पावसाळा साचत असलेले पाणी, आणि येथील रस्त्यांची दुरावस्था यासाठी या रस्त्याचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. संबंधित ठेकेदाराकडून या रस्त्याचे खोदकाम सुरू असताना जमिनीखालील, पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या फुटल्यामुळे, या परिसरातील जवळपास २० ते २५ रहिवाशी संकुलात गेल्या सहा दिवसांपासून पाणीच आलेले नाही.

बदलापूर पश्चिमेकडील बेलवली येथील भुयारी मार्ग जो पूर्वेकडून पश्चिमेला जोडला जातो, या भुयारी मार्गात पावसाळा साचत असलेले पाणी, आणि येथील रस्त्यांची दुरावस्था यासाठी या रस्त्याचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. संबंधित ठेकेदाराकडून या रस्त्याचे खोदकाम सुरू असताना जमिनीखालील, पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या फुटल्यामुळे, या परिसरातील जवळपास २० ते २५ रहिवाशी संकुलात गेल्या सहा दिवसांपासून पाणीच आलेले नाही.

## अंबरनाथ बदलापूर मार्ग बंद करु - स्थानिकांचा इशारा

जीवन प्राधिकरणाकडून मिळालेल्या आश्वासनानंतरही अद्याप, पाणीपुरवठा सुरळीत झाला नसल्याने, या रहिवाशांनी रस्त्याचे काम बंद पाडत आंदोलन केले. पाणी नसल्यामुळे घरातील आजारी, वयोवृद्ध, व लहान मुलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आम्ही आमची रोजची दैनंदिन काम करायची कशी? हा प्रश्न आम्हाला पडलेला आहे. त्यामुळे लवकरात लवकर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या ठिकाणी येऊन कामाकडे लक्ष देऊन, आमच्या परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करून द्यावा, संबंधित वाहिनीत पाण्याचा दाब कमी असेल तर, दुसऱ्या जलवाहिनीतून आम्हाला नवीन पाईप टाकून द्यावेत अशी मागणी येथील रहिवाशांनी केली आहे. आमच्या मागण्या मान्य न झाल्यास, आम्ही अंबरनाथ बदलापूर मुख्य मार्गात बसून आंदोलन करू, तसेच हा मार्ग बंद पाडू आता इशारा या रहिवाशांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दिला आहे.

## जलवाहिनी फुटल्याने पाण्यासाठी वणवण

येथील रहिवाशांना गेल्या सहा दिवसापासून पाण्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रहिवासी माझ्याकडे आल्यानंतर लगेचच मी त्यांना घेऊन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची भेट घेत, लवकरात लवकर ही समस्या सोडवण्यासाठी विनंती केली. या उपर मी स्वतः स्वखर्चातून या ठिकाणी नवीन जलवाहिन्या टाकून देत असून, जीवन प्राधिकरणाने त्यातून नळ जोडणी करून द्यावी व पाणीपुरवठा सुरळीत करून द्यावा, असे समाजसेवक गणेश भोपी यांनी म्हटले. या ठिकाणी रस्त्याचे काम सुरु असताना, येथे पाणीपुरवठा करणारी जीवन वाहिनी फुटली असून, ती दुरुस्त करून नव्याने लावण्यासाठी ठेकेदाराला सूचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे आज आणि उद्या या दोन दिवसात हे काम पूर्ण होऊन, उद्यापासूनच या परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे बदलापूर उप अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सुरेश खादरी यांनी म्हटले.



# मिठी नदीचा गाळ दिवा-मुंब्रात टाकण्यास विरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे महापालिका हद्दीतील मुंब्रा आणि दिव्यात छुप्या पद्धतीने सुरु झालेल्या बेकायदा डम्पिंगच्या दुर्गंधीने नागरिक आधीच हैराण झाले आहेत. असे असताना मुंबईच्या मिठी नदीतून निघणारा गाळ मुंब्या, दिव्यात टाकण्याचा निर्णय प्रशासकीय स्तरावर घेण्यात आला आहे.

या निर्णयाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने कडाडून विरोध केला आहे. मिठीचा गाळ मुंब्रा, दिव्यात टाकला तर उद्रेक होईल असा इशारा संतप्त शिवसैनिकांनी दिला आहे. मिठी नदीचा गाळ काढण्याच्या कामास सुरुवात झाली. गाळ बाजूला काढल्यानंतर तो पूर्णपणे सुकला की त्याची नोंद करून डंपरद्वारे महापे येथील डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जात होता. मात्र गेल्या काही दिवसात झालेल्या पावसाने महापे येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचून दलदल निर्माण झाली आहे. त्यामुळे डंपरचालक गाळ नेण्यास टाळाटाळ करत आहेत. अशात मिठीच्या काठावर मोठ्या प्रमाणावर गाळ पडून आहे. मोठ्या पावसाला सुरुवात झाल्यास हाही गाळ पुन्हा नदीत वाहून जाण्याची भीती आहे. त्यामुळे त्याची तत्काळ विल्हेवाट लावणे गरजेचे असल्याने प्रशासनाने ठाणे महापालिका हद्दीतील मुंब्रा किंवा दिवा येथे जागेची निवड केली आहे. याला विरोध करीत शिवसेना दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांनी पालिका आयुक्त सौरभराव यांना निवेदन देत हरकत घेतली आहे.

# कायमस्वरूपी नोकरीत सामावून घ्या

## पिसे पांजरापोळ प्रकल्पबाधितांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी, ता. ४ : मुंबईपाठोपाठ ठाणे, भिवंडी महापालिका क्षेत्रासाठी पाणीपुरवठा योजना राबवण्यासाठी तालुक्यातील पिसे पांजरापोळ येथील शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित झाल्या आहेत. अशा प्रकल्पबाधितांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे. मुंबई महापालिकेने मुंबईकरांना पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी नाममात्र किमतीत जमिनी संपादित केल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकऱ्या मिळाव्यात म्हणून येथील अनेक वेळा मोर्चे आंदोलन सत्याग्रह झाले होते. त्यानंतर मुंबई महापालिकेने प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या दिलेल्या आहेत, परंतु काही प्रकल्पग्रस्तांना वेगवेगळ्या अटी-शर्थीमुळे नोकरीपासून वचित ठेवले आहे, तर प्रकल्पग्रस्तांच्या निवृत्तीनंतर त्यांच्या वारसांना नोकरीवर घेणे आवश्यक आहे, पण १५ वर्षांपासून तात्पुरत्या स्वरूपात कामावर ठेवून अन्याय केला आहे, असा आरोप विष्णू शेलार यांनी केला आहे. तसेच मागणी पूर्ण झाली नाही, तर आंदोलनाचा इशाराही दिला आहे.











# गीतासार



### अध्याय १३
### क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः

श्रीभगवानुवाच इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते । एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ १३-१ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), हे शरीर क्षेत्र या नावाने संबोधिले जाते आणि याला जो जाणतो त्याला, त्याचे तत्त्व जाणणारे ज्ञानी लोक, क्षेत्रज्ञ असे म्हणतात. ॥ १३-१ ॥

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत । क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ १३-२ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), तू सर्व क्षेत्रांमध्ये क्षेत्रज्ञ अर्थात जीवात्माही मलाच समज आणि क्षेत्र व क्षेत्रज्ञ अर्थात विकारांसहित प्रकृती व पुरुष यांना जे तत्त्वतः जाणणे, ते ज्ञान आहे, असे माझे मत आहे. ॥ १३-२ ॥

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत् । स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥ १३-३ ॥

ते क्षेत्र जे आणि जसे आहे, तसेच ज्या विकारांनी युक्त आहे आणि ज्या कारणांपासून जे झाले आहे, तसेच तो क्षेत्रज्ञही जो आणि ज्या प्रभावाने युक्त आहे, ते सर्व थोडक्यात माझ्याकडून ऐक. ॥ १३-३ ॥

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक् । ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ १३-४ ॥

हे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाचे तत्त्व ऋषींनी पुष्कळ प्रकारांनी सांगितले आहे आणि निरनिराळ्या वेदमंत्रांतूनही विभागपूर्वक सांगितले गेले आहे. तसेच पूर्णपणे निश्चय केलेल्या युक्तियुक्त ब्रह्मसूत्राच्या पदांनीही सांगितले आहे. ॥ १३-४ ॥

### पालघर जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत
# जलस्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरणाचे प्रशिक्षण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : जल जीवन मिशन अंतर्गत हर घर नल से जल पुरवठा करण्यात येणार असून याकरीत जलस्त्रोतांना दुषित आणि प्रदुषणापासून संरक्षण देण्यासाठी स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरणांची गरज ओळखुन शासन स्तरावरुन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

केंद्र शासनच्या निवड सुचितील मुख्य संसाधन संस्था मार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जलस्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील पाच प्रतिनीधींचे दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण व पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती प्रशिक्षणाचा शुभारंभ पंचायत समिती पालघर अंतर्गत चिंतामणी मंगल कार्यालय सभागृह येथे करण्यात आला. तर डहाणु तालुक्यामध्ये लक्ष्मी प्लाझा हॉल, डहाणु येथे शुभारंभ करण्यात आला. सदर प्रशिक्षणाला ग्राम पाणी पुरवठा समिती अध्यक्ष- सरपंच व सचिव- ग्रामसेवक व इतर तिन सदस्य उपस्थित होते.

पाणी टंचाई दूर करण्यासाठी आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यासाठी एक परिवर्तनकारी निर्णय असून, या माध्यमातून ग्रामीण समुदायांमध्ये सामाजिक आर्थिक स्तर उंचावणेसाठी चालना देण्यात येईल. जल जीवन मिशन हा केंद्र शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सन २०१९ पासून राबविला जात आहे. प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला वैयक्तिक कार्यात्मक घरगुती नळ कनेक्शनाद्वारे सुरक्षित आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

## ठाणे जिल्ह्यात
# कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, दर्जेदार व सहजसुलभ करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम राबवली जात आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात कर्करोग मोबाइल व्हॅन कार्यरत असून, नागरिकांना कर्करोग तपासणीसाठी सुविधा उपलब्ध होत आहे.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली या व्हॅनचे प्रभावीपणे संचालन केले जात आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिलेल्या



माहितीनुसार, या मोबाइल व्हॅनद्वारे मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग यांसारख्या प्रमुख कर्करोगांची तपासणी केली जात आहे. ही व्हॅन आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असून, ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना प्राथमिक तपासणीसाठी रुग्णालयात न जाता त्यांच्या परिसरातच ही सेवा मिळते.

फेब्रुवारी २०२५ व मे २०२५ या दोन महिन्यातील कालावधीत एकूण ४४९० नागरिकांची तपासणी करण्यात आली असून, त्यामध्ये २३७ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. या संशयित रुग्णांना पुढील निदान व उपचारासाठी संबंधित आरोग्य संस्थांकडे पाठविण्यात आले आहे.

कर्करोग हा असंसर्गजन्य आजार असून त्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. परंतु वेळीच निदान झाल्यास योग्य उपचाराद्वारे रुग्णाचे आयुष्य वाचवता येते. याकरिता कर्करोग मोबाइल व्हॅन उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

# कोरोनामुळे केडीएमसी क्षेत्रात एकाचा मृत्यू

**आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात आज कोरोनामुळे एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आजच्या कोरोना रुग्णांची संख्या शून्य असून एकूण रुग्णांची संख्या 13 झाली आहे. यापैकी खाजगी रुग्णालयात एक रुग्ण दाखल असून 7 रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. कोरोनामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या 3 असून गृह विलगीकरण 2 रुग्ण असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

आजचा मृत रुग्ण हा डोंबिवलीतील 77 वर्षाचा व्यक्ति असून 28 मे रोजी खाजगी हॉस्पिटल डोंबिवली येथे ॲडमिट होता. या रुग्णाची आरटीपीसीआर टेस्ट 29 मे रोजी केली गेली असता ती 30 मे रोजी पॉझिटिव्ह आली होती. या व्यक्तीला सहव्याधी म्हणजे कॅन्सरचा त्रास होता. या रुग्णाचा मृत्यू दिनांक 4 जून 2025 रोजी सकाळी खाजगी हॉस्पिटल येथे झाला आहे. या व्यक्तीने कोविड लस घेतलेली आहे अशी माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर दीपा शुक्ल यांनी दिली आहे.

# जागतिक पर्यावरण दिन



आज ५ जून, आजचा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुर्मान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघात ( युनो ) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले. याच संमेलनात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम United Nations Environment Program ( UNEP ) चा जन्म होऊन दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले, यामुळे लोकं, सरकार आणि समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करता येईल. याच संमेलनात भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पर्यावरणाची बिघडती जागतिक परिस्थिती आणि त्याचा जगाच्या भविष्यावर होणारा प्रभाव या विषयावर प्रभावी भाषण दिले आणि समतोल पर्यावरणाचे महत्व विशद केले. आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक स्तरावर हे भारत सरकारचे पहिले महत्वाचे पाऊल होते. पुढील वर्षी म्हणजे १९७३ मध्ये धरती हा विषय घेऊन मोजक्या संकल्पनेसहित हा दिवस साजरा करण्यात आला. १९७४ मध्ये जगातील विविध शहरात हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करणे सुरू झाले आणि तिथून पुढे संपूर्ण जगभर दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून संपूर्ण आत्मीयतेने साजरा केला जातो. दरवर्षी सुमारे १५० देश हा दिवस साजरा करतात आणि दरवर्षी वेगळा देश हा उपक्रम जागतिक स्तरावर आयोजित करतो. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. २०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते. २०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते . २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही त्या वर्षीची थीम होती. २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक होता प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही त्या वर्षीची थीम होती. त्या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली गेली. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला. मागील वर्षी म्हणजे २०२४ साली आपली जमीन आपले भविष्य : जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळ प्रतिरोधकता या थीम खाली साजरा केला गेला. या थीमचा उद्देश जमीन पुनर्संचयित करणे वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी सक्षम राहणे हा होता. मागील वर्षी सौदी अरेबिया हा जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक होता. या वर्षी म्हणजे २०२५ साली दक्षिण कोरिया जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक असून प्लास्टिक प्रदूषण थांबवा ही यावर्षीची थीम आहे. या थीमचा संदेश आहे की प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी जागतिक स्तरावर एकत्र येऊन काम करणे. UNEP नुसार पप्लास्टिक प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे, जी पर्यावरणास आणि मानवी आरोग्यास धोकादायक आहे. आजच्या दिवसाचे औचित्य साधून जगभर प्लास्टिक प्रदूषण आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल लोकांना जागृत करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. जगभरातील लोकांनी या दिवशी पर्यावरणाचे जतन करुन मानवी भविष्य सुरक्षित करण्याचा संकल्प केल्यास आणि प्लास्टिक मुक्तीचा ध्यास घेतल्यास या दिवसाचे सार्थक होईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# हिंदुत्वाचा मुद्दा : कल्याणात शिंदे – ठाकरे गट एकत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राज्यभरात शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गटात संघर्ष पाहायला मिळत असताना, कल्याण मध्ये मात्र ठाकरे गटाचे उपनेते विजय साळवी आणि शिंदे गटाचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्यासह कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांची भेट घेतली. निमित्त होते ते बकरी ईद निमित्त किल्ले दुर्गाडीवर घंटानाद आंदोलनाचे. बैठक संपल्यानंतर या दोघांनी देखील आमचे पक्ष जरी वेगळे असले तरी आम्ही हिंदू आहोत आणि हिंदू म्हणूनच राजकीय पक्ष बाजूला सारून आम्ही एकत्रित पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांची भेट घेतल्याचे सांगितले. यावेळी



त्यांनी किल्ले दुर्गाडी येथे नमाज सुरू असताना दुर्गाडी देवीचं मंदिर देखील खुले असू द्या अशी मागणी पोलीस उपायुक्तांकडे केली

कल्याण येथील दुर्गाडी किल्ल्यावर हिंदू व मुस्लीम या दोन्ही समाजाची धार्मिक स्थळे असून दोघांनीही आपले हक्क सांगितले आहेत. बकरी ईद निमित्त दोन धर्मामध्ये कोणतेही वाद होऊ नये यासाठी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी सकाळी मुस्लीम बांधव नमाज पठण करत असताना पोलिसांकडून हिंदु बांधवांना सकाळी दुर्गाडी किल्ल्यावर आरती व घंटानाद करण्याकरिता प्रवेश बंदी केली जाते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार हि बंदी झुगारण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली 1986 सालापासून शिवसेनेने घंटानाद आंदोलन सुरु केले. तेव्हापासून दरवर्षी बकरी ईद निमित्त कल्याण मध्ये शिवसैनिक घंटानाद आंदोलन करतात.

शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिवसेना शिंदे गट व शिवसेना ठाकरे गट दोघेही वेगवेगळे आंदोलन करतात. याच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कल्याण परिमंडळ 3चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी शिवसेना शिंदे गट, ठाकरे गटासह हिंदू संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीला शिवसेना शिंदे गटाचे आमदार विश्वनाथ भोईर, ठाकरे गटाचे उपनेते विजय साळवी यांच्यासह दोन्ही गटाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी बकरी ईद निमित्त मुस्लिम समाजाचे नागरिक नमाज अदा करत असतात या वेळेला मंदिर प्रवेश बंदी असते. आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या 35 वर्षांपासून या निर्णयाच्या विरोधात शिवसेनेकडून घंटानात आंदोलन सुरू आहे. ईदच्या दिवशी किल्ले दुर्गाडी मंदिरात जाण्यास परवानगी द्यावी अशी मागणी आम्ही केली आहे. हिंदू म्हणून आम्ही एकत्र आलोत आमच्या सोबत इतर हिंदू संघटना देखील आहेत असे आमदार भोईर यांनी सांगितले.

तर ठाकरे गटाचे उपनेते विजय साळवी यांनी देखील आम्ही हिंदू म्हणून एकत्र आलोत. आंदोलन मात्र आमच्या पक्षातर्फेच होईल. आमची मागणी बकरी ईदच्या दिवशी नमाज सुरू असताना मंदिर देखील खुले ठेवण्यात यावे ही आहे असे सांगितले.






# धार्मिक सण साजरा करताना कायद्याचे पालन करा

## - भिवंडी पोलीस उपायुक्त यांचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : शांतता समीती सदस्य हे पोलीस व जनतेचा दुवा म्हणून काम करीत असतात त्यामुळे पोलिसांना फार मोठी मदत होते.नागरिकांनी सुध्दा कायदासुव्यस्था चांगली ठेवण्यासाठी पोलिसांना सहकार्य करणे गरजेचे आहे,धार्मिक सण साजरा करताना प्रत्येकाने शासन व पोलिसांनी दिलेल्या सुचन व दिलेल्या परवानगीचे पालन करणे आवश्यक आहे.भिवंडी महापालिका आयुक्त प्रशासनाने बकरी ईद सणानिमित्त विविध सोईसुविधा कायद्यानुसार उपलब्ध करून





देणे आवश्यक आहे यासाठी पोलीस प्रशासनाच्यावतीने महापालिका प्रशासनाला पत्र देण्यात आले आहे व विशेष बैठक घेण्यात आली असल्याची अशी माहिती भिवंडी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे यांनी दिली.

भिवंडी शहर परिसरात येत्या 7 ते 9 जून दरम्यान मुस्लिम बांधवांचा पवित्र असा बकरी ईद हा साजरा होणार आहे त्या निमित्ताने भिवंडी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे यांनी पोलीस संकुल सभागृहात शांतता समिती सदस्य व नागरिकांची विशेष बैठक आयोजित केली होती या बैठकीस सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे व सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महिला व नागरिक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता महापालिका प्रशासनाच्यावतीने शहरात बकरी ईद दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी तसेच नादुरुस्त झालेले रस्ते दुरुस्त करावे, विजेचे भारनियमन न करता वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा अशा विविध मागण्या यावेळी नागरिकांच्यावतीने करण्यात आल्या तसेच मनपाच्या कार्यशैली संदर्भात नाराजी व्यक्त करण्यात आली त्यामुळे पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी सांगितले की धार्मिक सण साजरा करताना प्रत्येकाने कायदा व पोलीस सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे तसेच पोलीस व पालिकेचा आवश्यक परवानगी घेण्यात याव्यात,नागरिकांना सोयी सुविधा निर्माण करून देण्यासाठी महापालिका प्रशासना सोबत लेखी पत्रव्यवहार करून चर्चा केली आहे, कुर्बानी सेंटरवर विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे तसेच शहरातील विविध भागात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून पोलीस प्रशासनाचे प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले नागरिकांनी सुद्धा कायद्याचे पालन करून धार्मिक सण साजरा करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रम सुत्रसंचालन एसीपी सचिन सांगळे यांनी केले.






## रेसिपी
# काकडीचे तिखट सांदणं



**साहित्य :**
काकडीचा किस, तांदुळाचा रवा किंवा जाड रवा किंवा मक्याचे पिठ

**कृती :**
हळद चवीप्रमाणे , मीठ , ओवा, हिरवी मिरची-आले बारीक वाटलरस, लिंबाचा रस,.चिमुटभर खाण्याचा सोडा. लागेल तसे थोडेसे पाणी .हे सर्व जिन्नस एकत्र करुन घ्यायचे मिश्रण सरसरीत असावे.आता एका डब्याला तेलाचा हात लावुन त्यात हे मिश्रण ओतुन कूकर मधे १० ते १२ मिनिटे वाफवावे.थंड झाल्यावर मिश्रणाच्या वड्या कापाव्या. हिंग-मोहोरी--जिरे घातलेली खमंग फोडणी घालायची.



## आजचे राशिभविष्य

**मेष**
व्यावसायिकांसाठी चांगली बातमी असून मोठी डिल होण्याची शक्यता आहे. तुमची काही कामे थांबलेली होती ती पूर्ण होतील.

**वृषभ**
तिर्थयात्रा करण्याची योजना आखणार आहात पण काही कारणामुळे ही यात्रा पुढे ढकलावी लागेल. मंगलकार्यासाठी खर्च करणार आहात.

**मिथुन**
तुम्हाला उत्तम यश मिळेल. जे जातक फ्रिलान्स काम करतात त्यांना मोठे प्रोजेक्ट मिळण्याची शक्यता आहे. रखडलेली कामे मार्गी लागणार आहेत.

**कर्क**
करिअर तसेच व्यवसायात चांगल्या संधी तुमच्या आसपास आहेत त्याचा लाभ घ्या.वादविवादाची परिस्थिती ऑफिसमध्ये निर्माण होईल.

**सिंह**
तुम्ही शांत राहा आणि संयमाने काम करा. व्यवसायात कोणताही निर्णय घेताना सतर्क राहा. आज जोखीम असणारे काम घेवू नका.

**कन्या**
कोणी तुमच्याकडे उधारी मागेल तर देवू नका. आर्थिक स्थिती ठिक असली तरी पैसे जपून वापरा आणि बचत करण्याचा प्रयत्न करा.

**तूळ**
तुम्ही स्वतः कामात फोकस ठेवा यामुळे कामे वेळेत मार्गी लागतील. अनेक दिवसांपासून सुरू असलेला ताण आज काहीसा कमी होईल.

**वृश्चिक**
घरासंदर्भातील मालमत्तेचा काही वाद कोर्ट-कचेरीमध्ये सुरु असेल तर त्यामध्ये निकाल तुमच्या बाजूने असेल.

**धनु**
घरात कोणी आजारी असेल तर त्याच्या तब्येतीत सुधारणा होणार आहे.तुम्ही परदेशात देखील व्यवसायाचा विस्तार करु शकता.

**मकर**
करिअरमध्ये प्रगती आहे. ऑफिसमध्ये तुम्हाला जे काही बोलायचे आहे ते स्पष्ट बोला, त्यामुळे समस्या कमी होतील.,ताणतणाव कमी होईल.

**कुंभ**
अपेक्षित धनलाभ झाल्याने मनोबल वाढेल. तुम्ही करिअरसाठी उपयोगी पडेल असे शिक्षण घेण्याचा विचार करत असाल तर त्वरित सुरुवात करा.

**मीन**
घरी वातावरण समाधानी असून सगळेजण तुम्हाला कामात मदत करण्यासाठी तयार राहतील. तुम्ही स्वतःसाठी वेळ काढणार असून खरेदी देखील कराल.




# लोकनेते स्व.गोपिनाथ मुंडे यांना टिटवळा भाजपाच्या वतीने अभिवादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**टिटवाळा :** दिवंगत केंद्रिय मंत्री तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या ११ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त भाजपा टिटवाळा मंडळाच्या वतिने अभिवादन व प्रतिमा पुजन कार्यक्रम भाजपा जनसंपर्क कार्यालयात संपन्न झाला.राज्यातील प्रस्तापित राजकीय समीकरणांना धक्का देत वाड्या वस्त्यावरिल उपेक्षित व वंचित बहुजन समाजाला भाजपा सोबत जोडणारे,राजकिय सत्तेपासून नेहमी दुर ठेवलेल्या समाजात स्वअस्मितेचे आणि सत्तेचे एक स्फुलिंग निर्माण करणारे आणि आपल्या प्रभावी वक्तृत्व आणि संघर्षाने राज्यात सत्तांतर करणारे नेते म्हणजे गोपीनाथजी मुंडे होय अशी भावणा याप्रसंगी उपस्थितांनी व्यक्त करुन श्रध्दांजली अर्पण केली.

यावेळी भाजपाचे टिटवाळा मंडळ अध्यक्ष शक्तिवान भोईर,अनिल फड,.विजय आव्हाड, दिपक कांबळे .ब्रिजेश पांडे,विनोद इंगळे,विशाल खिसमतराव,अशोक नागरगोजे, ज्ञानेश्वर वणवे,ज्ञानेश्वर आंधळे,गणपत बडे, वसंत सांगळे,सुनिल बुरकुल,पांडुरंग आव्हाड, मारुती नागरगोजे यांची उपस्थिती होती.

# बियाणे घेण्यासाठी शेतकऱ्यांची झुंबड




## वरुणराजा रुसल्याने बळीराजा चिंतेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पावसाला सुरुवात होताच बळीराजाला पेरणीचे वेध लागतात, त्यामुळे शेतकऱ्यांनी ५०टक्के अनुदानावर आलेले बियाणे खरेदी करण्यासाठी कल्याण पंचायत समितीच्या कृषी विभागात शेतकऱ्यांची झुंबड उडाली आहे, परंतु गेल्या २/३ दिवसापासून वरुण राजा रुसल्याने बळीराजा ची चिंता वाढली आहे.

कल्याण पंचायत समितीच्या कृषी विभागाकडे सुमारे १००क्विंटल भात बियाणे उपलब्ध झाले असून ते ५०टक्के अनुदानावर आहे,यांचे वाटप सोमवार म्हणजे आज पासून सुरू झाले आहे. यासाठी आधारकार्ड, फार्मर आयडी, आणि ७/१२ इत्यादी कागदपत्रे आवश्यक असून याचा तालुक्यातील शेतक-यांनी लाभ घ्यावा असे आवाहन कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांनी केले आहे.

कल्याण तालुक्यात २९ हजार ७९४:९२ हेक्टर भोगोलिक क्षेत्र आहे. तर एकूण लागवडीखालील क्षेत्र ८ हजार २७२ ऐवढे आहे. यामध्ये भात पिकाखालील क्षेत्र ४ हजार ३६९ इतके आहे. यातही हळवे भात क्षेत्र १७३८ हेक्टर, निमगरवे भातक्षेत्र १५०० हेक्टर, व गावे भातक्षेत्र १२००हेक्टर, असे खरिप पिकाखालील एकूण क्षेत्र ४ हजार ४३८ हेक्टर आहे.

त्यासाठी खरीप हंगाम सन २०२५ मध्ये जिल्हा योजना सेस अंतर्गत ५०टक्के अनुदानावर सुमारे १०० क्विंटल भात बियाणे आले आहे,यामध्ये कर्जत-३,२० क्विंटल, कर्जत ५,१० क्विंटल, कर्जत२,१० क्विंटल, आणि जया ६० क्विंटल चार समावेश आहे. या शिवाय तालुक्यात परवाना धारक बियाणे विक्रेते ८ असून त्याच्याकडे खाजगी कंपनीचे ३० जातीचे एकूण ४३१.९६ क्विंटल उपलब्ध झाले आहे.

शेतक-यानी बियाणे खरेदी करताना परवानाधारक बियाणे विक्रेते यांच्याकडून खरेदी करावे व रितसर पावती घ्यावी त्यामध्ये बियाणे लॉंट नंबर नमूद करुन घ्यावा. त्यामुळे आज गोवेली ठाकूरपाडा, चौरे, खोणी, उंबार्डे,, बापस ई,नांदप, केळणी, कोलम, अंतार्ली,आदी गावातील शेतकरी बियाणे घेण्यासाठी आले होते. परंतु गेल्या२/३दिवसापासून वरुण राजा रुसल्याने बळीराजांची चिंता वाढली आहे.

# एसटी सेवानिवृत्तांना वर्षभर मोफत पास

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**भिवंडी :** राज्यभरातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिलवर झालेल्या बैठकीमध्ये वर्षभरासाठी मोफत पास जाहीर करुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कित्येक वर्षाच्या मागणीला न्याय दिला आहे.

राज्य परिवहन सेवानिवृत्त कर्मचारी संघटना वर्षंभराच्या पासासाठी गेली कित्येक वर्ष महामंडळाकडे मागणी करत होती.सतत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन तो ९ महिन्यांचा संघटनेने करुनही घेतला होता,परंतु हा पास वर्षभरासाठी व्हावा ही मागणी संघटनेचे सरचिटणीस सदानंद विचारे यांनी गेली वर्षभर लावून धरली होती आणि अखेर आज संघटनेने केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे.

कर्मचारी व त्यांच्या पत्नीसाठी वर्षभरासाठी मोफत पास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर करताच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी संघटनेच्या पदाधिकारी व सर्व सदस्यांनी उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,परीवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार मानले.

मंत्रालयात झालेल्या बैठकीत सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेला विशेष निमंत्रित करुन, परिवहन मंत्र्यांनी जो ज्येष्ठांचा सन्मान केला.त्याबद्दल सरचिटणीस सदानंद विचारे यांनी यावेळी परिवहन मंत्र्यांचे आभार मानले.

सेवा निवृत्त संघटनेच्यावतीने सरचिटणीस सदानंद विचारे, कोषाध्यक्ष गणेश वायफळकर उपस्थित होते .

सरचिटणीस सदानंद विचारे यांनी प्रलंबित प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी केली व एसटी ने सेवाशुल्क न भरल्यामुळे पेन्शनचे दावे कसे प्रलंबित आहेत हे मंत्री महोदयांना पटवुन सांगितले ..प्रलंबित पेन्शनच्या दाव्यांसाठी सरकार पातळीवर स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येईल असा शब्द मंत्री महोदयांनी संघटनेला दिला आहे .

१२ जुन रोजी एसटीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या सोबत संघटनेची सविस्तर मिटिंग असल्याचे सदानंद विचारे यांनी सांगितले. असे संघटनेचे प्रसिद्धी सचिव रत्नपाल जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# ठाणे महापालिकेत लोकशाही दिन

## २३ जूनपूर्वी निवेदन सादर करण्याचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




**ठाणे (०४) :** ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन दि. ०७ जुलै, २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी जुलै महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच दिनांक २३ जूनपूर्वी त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावे. हे निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर-२०१२पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांची निवेदने न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर एक महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

# भारताची आयर्नमॅन रेनी नोरोन्हा

## चौदा तासांत पूर्ण केली हॅम्बर्ग युरोपियन चॅम्पियनशिप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



भारताची सर्वात तरुण महिला आयर्नमॅन रेनी नोरोन्हा (वय १९) हिने १४ तासांत आयर्नमॅन हॅम्बर्ग युरोपियन चॅम्पियनशिप पूर्ण केली. आयआयटी मद्रासची विद्यार्थिनी असलेल्या रेनी हिने तरुणांमध्ये सहनशक्तीच्या खेळांच्या उदयाचे विजेतेपद पटकावले आहे.

हॅम्बर्ग, जर्मनी १ जून २०२५ : भारताची सर्वात तरुण महिला आयर्नमॅन रेनी नोरोन्हा हिने १ जून २०२५ रोजी आयर्नमॅन हॅम्बर्ग युरोपियन चॅम्पियनशिप यशस्वीरित्या पूर्ण केली. दृढनिश्चय आणि क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेचे एक प्रभावी प्रदर्शन याद्वारे केवळ १४ तासांत रेनी नोरोन्हा हिने कठीण शर्यत पूर्ण केली.

युरोपमधील सहनशक्तीच्या स्पर्धांपैकी सर्वात महत्वाची एक असलेल्या या चॅम्पियनशिपमध्ये ३.८ किमी पोहणे, १८० किमी सायकल चालवणे आणि ४२.२ किमी मॅरेथॉनचा समावेश आहे. अवघ्या १९ वर्षांच्या रेनीने ही स्पर्धा जिंकून हे सिद्ध केले आहे की, वय हे उच्च दर्जाच्या ॲथलेटिक यशासाठी अडथळा नाही. जिंकण्याची इच्छाशक्ती व प्रयत्नातील सातत्य यामुळे विजय निश्चित असतो.

रेनीला मिळालेल्या यशानंतर ती म्हणाली, "स्पर्धेतील माझा सहभाग हा केवळ शर्यत पूर्ण करण्यासाठी नव्हता, भारतातील तरुणांना, प्रामुख्याने मुलींना हे दाखवून देण्यासाठी होता की, सहनशक्तीचे खेळ आपल्यासाठी देखील आहेत. या खेळात तुम्ही निर्माण केलेली शिस्त आणि आत्मविश्वास तुमचे व्यक्तिमत्व बदलण्यास सहाय्यक ठरते. विद्यार्थीदशेतील खेळाडू ते आयर्नमॅन फिनिशर असा रेनीचा प्रवास तरुणवर्गाला एक आदर्शमय असा प्रवास आहे. तिच्या कामगिरीमुळे विद्यार्थीवर्गातील खेळाडूंमध्ये एक सांस्कृतिक बदल घडवून येण्याची आशा आहे. इच्छुक ट्रायथलीट्स खेळाडूंना समर्थन देण्यासाठी अधिक दृश्यमानता, प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधा याकरीतास रेनीचे यश प्रभावशील ठरते.

# उल्हासनगर पोलिस उपायुक्त कार्यालयाबाहेर प्रहार जनशक्ती संघटनेचे ठिय्या आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. ४ (वार्ताहर)** सत्तेच्या खुर्चीत बसलेल्यांना जाग आणण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागते आणि जेव्हा "प्रहार" रणभूमीवर उतरतो, तेव्हा यंत्रणा हलते!," अशी प्रतिक्रिया देत प्रहार जनशक्ती संघटनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्नील पाटील यांनी उल्हासनगर परिमंडळ ४ च्या पोलिस उपायुक्त कार्यालयाबाहेर मंगळवारी (ता. ३) ठिय्या आंदोलन केले. पोलिस उपायुक्त कार्यालयावर प्रहार जनशक्ती पक्ष आणि राष्ट्र कल्याण पार्टीच्या संयुक्त नेतृत्वाखाली झालेल्या ठिय्या आंदोलनानंतर प्रशासनाने तब्बल आठ गंभीर मुद्द्यांवर तत्काळ निर्णय घेऊन सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

प्रहार जनशक्ती पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्नील पाटील व राष्ट्र कल्याण पार्टीचे शैलेश तिवारी यांच्या नेतृत्वाखाली शहरातील ढासळलेल्या कायदा-सुव्यवस्थेविरोधात आणि पोलिस प्रशासनातील निष्क्रियतेच्या विरोधात ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते, दिव्यांग बांधव, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, हे आंदोलन केवळ सुरुवात आहे. नागरिकांच्या हक्कांसाठी आणि सुरक्षिततेसाठी प्रहार आणि राष्ट्र कल्याण पार्टीचा संघर्ष अखंड सुरूच राहणार आहे, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

> आजचे आंदोलन लोकशक्तीचा विजय आहे. उल्हासनगरच्या जनतेच्या सुरक्षेच्या प्रश्नांवर आम्ही रस्त्यावर उतरलो आणि प्रशासनालाही झुकावे लागले. डान्स बारचे परवाने रद्द होणे, खंडणीप्रकरणी चौकशी, दिव्यांग कायद्याची अंमलबजावणी यासारख्या निर्णयांनी आम्ही सुरुवातीचा विजय मिळवला आहे. जोपर्यंत प्रत्येक नागरिकाला सुरक्षित वाटत नाही तोपर्यंत प्रहारची भूमिका आक्रमकच राहील. आमचा लढा अन्याय, भ्रष्टाचार आणि निष्क्रियतेविरोधात आहे आणि तो न थांबता सुरूच राहील.
>
> ■ ॲड. स्वप्नील पाटील, ठाणे जिल्हाध्यक्ष, प्रहार जनशक्ती

या आंदोलनादरम्यान पोलिस उपायुक्त परिमंडळ-४ यांनी आंदोलनकर्त्यांची मागण्यांची गांभीर्याने दखल घेत पुढील महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली. त्यामध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ अंतर्गत कलम ९२ व ९३ लागू करण्याचे आदेश मंगळवारी संध्याकाळपर्यंत सर्व पोलिस ठाण्यांना दिले जातील, अशी हमी त्यांनी दिली. शहरातील प्रभू श्रीराम चौकातील तसेच इतर डान्सबारचे परवाने रद्द करण्यात आले असून, पुढील कारवाईसाठीही प्रक्रिया सुरू आहे. खंडणी मागणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांवर प्राथमिक चौकशीत दोषी असल्याचे स्पष्ट झाले असून, त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण झाल्यावर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल. पोलिस सन्मानचिन्हाचा केक कापल्याच्या प्रकरणात पोलिस शिपाई योगेश शिंदे यांची एक वर्षाची वेतनवाढ थांबवण्यात येणार आहे. याबाबत त्यांना शिस्तभंगाची नोटीस देण्यात आली आहे. . शहरातील सर्व अवैध धंद्यांविरोधात सातत्याने मोहीम उघडण्यात येईल व पोलिस गस्त वाढविण्यासाठी वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

## ' हर घर एक झाड' अभियान अंतर्गत वृक्षलागवडीसाठी

# भिवंडी मनपाचे वृक्षप्रेमींना आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** पर्यावरणाच्या दृष्टीने भिवंडी शहरात सन २०२५-२६ मान्सून काळात शासन धोरणानुसार मोठया प्रमाणात वृक्षलागवड व संवर्धन बाबतची मोहीत महानगरपालिकेने हाती घेतलेली आहे.

त्यानुसार ५ जुन २०२५ जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन शहरात वृक्षप्रेमी नागरीकांकडून " हर घर एक झाड" अभियान अंतर्गत मोठया प्रमाणात वृक्षलागवड करण्यात यावी त्याकरिता महानगरपालिकेकडून वृक्षरोपे उपलब्ध करुन देण्यात येत असून, लागवड केलेल्या वृक्षरोपांचे जतन व संवर्धनाबाबतचे जि.ओ. टॅगींग फोटो महानगरपालिकेच्या ट्विटरवर प्रसारीत करण्यात येऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे असे वृक्षप्रेमी नागरीकांस मा. प्रशासक तथा आयुक्त सो, भिवंडी नि. शहर महानगरपालिका यांचेमार्फत आवाहन करण्यात येत आहे. अशी माहिती मुख्य उद्यान अधीक्षक आणि पर्यावरण विभाग प्रमुख निलेश संखे यानी दिली आहे.

# वऱ्हाळा तलाव स्वच्छ करा

## माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. ४ (बातमीदार):** भिवंडी निजामपूर शहर महापालिका हद्दीत कामतघर भागात असलेल्या वऱ्हाळा तलावातील २.० एमएलडी पाण्याचा पुरवठा भिवंडी गावात होतो. सद्यः स्थितीत वऱ्हाळा तलावाची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. तलावात मोठ्या प्रमाणात कचरा पडलेला आहे. तलावातील पाणी अतिशय खराब झालेले आहे. तसेच पाण्याला अतिशय कुबट, घाण वास सुटून पाण्यावर हिरवा तरंग निर्माण झालेला आहे. शहरातील नागरिकांनी तलावाच्या घाण पाण्याचे सेवन केल्यास आजारी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे या तलावातील दुर्गंधी दूर करण्यासाठी कारवाईची मागणी माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांनी लेखी पत्राद्वारे केली आहे.

वऱ्हाळा तलावाच्या पाण्याला येत असलेल्या घाण वासामुळे आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांचे राहणे मुश्किल झाले आहे. त्या घाण वासामुळे नागरिक, मुले, महिलांना सर्दी, खोकला, दमा, श्वासाची रोगराई पसरलेली आहे. तलाव परिसरातील स्थानिक नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले असून, स्थानिक नागरिक त्रस्त झालेले आहेत.

ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. याविषयी महापालिका प्रशासनाने गांभीर्यपूर्वक तातडीने दखल घेत तलावातील पाणी स्वच्छ करण्याची उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

तसेच वऱ्हाळा तलावाच्या पाण्यावर दुर्गंधीनाशक जंतुनाशक औषधांची फवारणी करण्याची मागणी व्हाळा तलाव परिसरातील नागरिकांकडून होत आहे. यासाठी आयुक्तांनी वहाळा तलावातील पाण्याची दुर्गंधी दूर करण्यासाठी दुर्गंधीनाशक जंतुनाशक औषधांची फवारणी करण्याबाबत संबंधित विभागास आदेश द्यावेत, अशी मागणी माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांनी लेखी पत्राद्वारे केली आहे.

# खारफुटीचे अस्तित्व नष्ट होण्याच्या मार्गावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे शहर, ता. ४ :** अभयारण्याचा दर्जा असलेला ठाणे खाडीचे पात्र खारफुटीची सर्रासपणे होणारी कत्तल, भराव केला जात आहे. याकडे कांदळवन विभाग, ठाणे महापालिका आणि राज्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळ दुर्लक्ष करत असल्याने ठाणे, मुंबईचे उधाणापासून रक्षण करणाऱ्या खाडीचे अस्तित्वच नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

त्सुनामी सारख्या घटनांनी खवळलेल्या समुद्रापासून मुंबई, ठाणे शहरांच्या अस्तित्वाला धोका पोहोचू नये, यासाठी निसर्गाने खाडी परिसरात घनदाट कांदळवने तयार केली आहेत. या कांदळवणातील खारफुटीमुळे समुद्राच्या लाटांचा मारा थोपवण्याचे काम केले जाते, मात्र असे असताना मुंबई, ठामे, नवी मुंबई परिसरातील खाडी परिसराला विविध संकटांचा सामना करावा लागत आहे. तिन्ही महापालिकांचे सांडपाणी खाडीपात्रात सोडले जात आहे. १९९१ पासून उपलब्ध सॅटेलाइट इमेजनुसार खारफुटींच्या कत्तली करून टाकलेल्या भरावामुळे खाडी पात्र संकुचित झाले आहे. विकसकांनी खाडीच्या जागा बुजवून त्या ठिकाणी टोलेजंग टॉवर उभे केले जात आहेत. रेती उपसा करण्यास बंदी असतानाही रेतीमाफियांकडून सर्रासपणे उपसा केला जात आहे. ठाणे महापालिकेच्या हद्दीतील बहुतांश खाडीकिनारे अतिक्रमित असून, भरावासोबतच मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात आहे. गायमुख खाडीकिनाऱ्यावर तर ठाणे महापालिकेकडूच मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात आहे. त्यामुळे पाण्यातील जलचरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

### पर्यावरणदृष्टीने महत्त्व धोक्यात

कोपरी, विटावा, कळवा, रेती बंदर, मुंब्रा, कोळशेत, कशेळी, गायमुख, नागला घाट परिसरात गणेश विसर्जन केले जाते. इतरवेळी रोज नागरिकांकडून निर्माल्य विसर्जित केले जातात. निर्माल्य प्लॅस्टिक पिशव्यांमधून थेट पाण्यात फेकले जाते. विसर्जित केलेले साहित्य कुजत असल्याने घाटाच्या किनाऱ्यावरील पाणी आणि गाळाला दुर्गंधी येत आहे. त्यामुळे पर्यावरणदृष्टीने महत्त्व असलेल्या खाडीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.




# अनिरुद्ध बापुंच्या भक्तांकडून सिडबॉलचे रोपण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आज सर्वत्र पहाता ठिकठिकाणी जंगलाचा ऱ्हास होताना दिसत आहे. निसर्गाचा समतोल ढासळत चालला आहे. परंतु ही निसर्गाबद्दल होणारी हेळसांड पहाता समाजात अशाही काही सेवाभावी व्रतस्थ संस्था आहेत ज्या आशेचा अंकुर जागवितात. होय! प.पु. सदगुरु श्री.अनिरुद्ध बापुंच्या मार्गदर्शनाने 'वनदुर्गा योजने' अंतर्गत भक्तांनी रविवारी दि.१ जून रोजी तब्बल १,७४,०५२ सिडबॉलचे रोपण केले.

पेरु, हरडा, बिहरडा, काजू अशा बियांचे माती व शेणखत मिश्रित हे सिडबॉल संस्थेच्या विविध उपासना केंद्रांवर बनविण्यात आले आणि शहापुर वनपरिक्षेत्र विभागाच्या मदतीने धसई परीसरात ह्या सिडबॉल्सचे रोपण करण्यात आले. पावसाची तमा न बाळगता जवळजवळ २०९ भक्त आणि डिएमव्ही या सेवेत सहभागी झाले होते.






## खडेगोळवली नाल्यात वाहत जाणाऱ्याला कर्मचाऱ्यांनी दिले जीवनदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केडीएमसी हद्दीतील खडेगोळवली नाल्याच्या वेगवान पाण्याच्या प्रवाहातून वाहत जाणर्या व्यक्तीला मनपा कर्मचारी, ठेकेदाराचे कामगार यांनी वाहत्या पाण्यातून बाहेर काढीत जीवनदान दिल्याची घटना बुधवारी घडली.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, केडीएमसीच्या आय प्रभागक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या खडेगोळवली नाल्याची साफसफाई कामाची पाहणी करण्यासाठी सहाय्यक आयुक्त उमेश यमगार यांचे पथक बुधवारी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास गेले असता, पावसामुळे नाल्याच्या पाण्याचा प्रवाह तीव्रतेने वाहत असताना , एका अनोळखी व्यक्ती मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत नाल्यात वाहत येत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी प्रत्यक्षदर्शी कोमल साव यांच्या सतर्कतेमुळे आणि रमेश साव व जगदीश कुमार शाह तसेच ठेकेदारांच्या सफाई कर्मचारी यांच्या धाडसी व तत्परतेमुळे पाण्यात उड्या टाकून सदर व्यक्तीला सुखरूपपणे नाल्यातून बाहेर काढण्यात आले.

ठेकेदाराचे सफाई कामगार देखील या प्रयत्नात सहभागी होते. या ठिकाणी पालिकेचे बचाव पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर डॉ. दिपाली मोरे यांनी घटनास्थळी येऊन वैद्यकीय तपासणी केली व संबंधित व्यक्तीस रुग्णवाहिकेतून रुक्मिणी बाई रुग्णालयात पाठवण्यात आले.

# निमा संस्थेमार्फत आरोग्य तपासणी शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरात सामाजिक कार्य करणाऱ्या जेष्ठ नागरिक संघातील सदस्य व नागरिकांसाठी भिवंडीतील निमा वैद्यकीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेश दहापूते व त्यांच्या सहकाऱ्यांचे पुढाकाराने विनामूल्य आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे तरी जेष्ठ महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासणी करून घ्यावी,असे आवाहन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सदानंद पिंपळे व श्रीपत तांबे यांनी केले आहे.



भिवंडी शहरातील आदर्श पार्क रोडवरील जेष्ठ नागरिक संघ (सेंट्रल) येथील सभागृहात वैद्यकीय आरोग्य तपासणी शिबीर दि.८ जून रविवार रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत होणार आहे.हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब, शरीरातील चरबीचे प्रमाण (BMI) तपासणी तज्ञ डॉक्टर राजेश दहापूते व अन्य डॉक्टराकडून करण्यात येणार आहे. निमा भिवंडी तालुका शाखा व एस.एस. हॉस्पिटल, काल्हेर यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर संपन्न होणार आहे.त्यामुळे नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन जेष्ठ नागरिक संघाच्यावतीने करण्यात आले आहे.

# हप्ता वेळेवर मिळत नसल्याने घरकुल योजनेचे लाभार्थी नाराज!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील घरकुल योजनेच्या अनेक लाभार्थ्यांना वेळेवर निधी वितरित न झाल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. महिनाभरापूर्वी संपूर्ण घरकुलाचे बांधकाम पूर्ण करूही हप्ता वेळेवर मिळत नसल्याचे आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात आले आहेत.

घरकुल योजनेत लाभार्थ्यांनी वेळोवेळी आवश्यक ती कागदपत्रे सादर केली असून, शासनाकडून त्यांच्या खात्यावर हप्त्यांचे वाटप होण्यासाठी निधी मंजूर केला जातो. घरकुलाच्या बांधकाम जसे पूर्ण होते त्यानुसार टप्प्याटप्प्यामध्ये निधी दिला जातो. परंतु काही घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले तरी फोटो वेळेवर अपलोड केले जात नसल्याने लाभार्थ्यांना घरकुलाचा हप्ता मिळण्यास विलंब होत असल्याचे बोलले जाते. गेल्या अनेक दिवसापासून मुरबाड तालुक्यामध्ये अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात पडत आहे पावसात अनेकांचे संसार भिजले आहेत त्यामुळे घरकुलाचा हप्ता वेळेवर पडला तरच लाभार्थी पुढील बांधकाम करू शकतो मात्र हप्ते वेळेवर पडत नसल्याने अनेक



घरकुल लाभार्थी नाराजी व्यक्त करत आहेत. त्यामुळे गरजूंना त्यांच्या घरकुल बांधकामाची कामे पुढे नेण्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. हप्ते वेळेवर पडत नसल्याने शेतकऱ्यांना आता शेतीची काम पूर्ण करायची की घरकुलाचे काम पूर्ण कराव अशा दुहेरी संकटामध्ये शेतकरी पडला आहे. काही घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे तर काहींचे काम थांबले आहे. आता आम्ही काय करायचे? असा सवाल उपस्थित झाला आहे. घरकुल मंजूर झाले असून काही लाभार्थ्यांना पहिलाच हप्ता मला मिळाला आहे. घर जवळपास पूर्ण बांधून झाले आहे. परंतु हप्ते वेळेवर मिळत नाही तसेच रोजगार हमीच्या माध्यमातून मिळणारी मजुरी मिळाली नाही असे घरकुल लाभार्थी सांगतात.

# शिक्षकांनी एकत्र राहून लढा उभारून प्रश्न सोडवूया

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आपली संघटना बलशाली व्हावी यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील राहून सेवानिवृत्त शिक्षकांचा लढा हा धैर्याने पुढे नेऊया आणि सहकार्याची व संघटनात्मक भूमिका घेऊन काम करूया यासाठी प्रत्येक व्यक्तीने संघटनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून योगदान देणे महत्त्वाचे आहे माणूस एकटा कधीही मोठा होत नाही तर तो संघटनेच्या जीवावरच मोठा होत असतो. शिक्षकांचे काम हे निश्चितच उजाला देण्याचे काम आहे म्हणून सामाजिक सेवा करण्याचे पुण्य काम करत असताना सर्व शिक्षक बांधवांनी एकसंघ राहून संघटनेचा लढा उभा करूया आणि आपले प्रश्न सोडवू या असे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष स.रा.म्हात्रे यांनी पेण येथे अध्यक्ष भाषण करताना सांगितले.

अखिल रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक व कर्मचारी संघाची सभा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष स.रा.म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली ३/६/२०२५ आगरी समाज विकास मंच चिंचपाडा पेण येथे संपन्न झाली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी



शर्मिला शेंडे पत्रकार धनाजी घरत जिल्हा निवृत्त न्यायाधीश डी.पी.म्हात्रे जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील राज्य प्रतिनिधी अविनाश म्हात्रे, सरचिटणीस गुरूनाथ पाटील कार्याध्यक्ष प.ज़ा.म्हात्रे, श्रीमती शुभदा दातार ,उज्वला निकम अभिमन्यू गावंड, राजाराम गावंड, नरेश पाटील, उत्तरा पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गजानन पाटील, कृष्णा मोकल, प्र. शं म्हात्रे, बापूजी मात्रे चंद्रकांत म्हात्रे रमाकांत म्हात्रे देविदास म्हात्रे अलका मोकल उत्तरा पाटील प्रदीप म्हात्रे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सेवानिवृत्ती शिक्षकांचा सत्कार शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.यावेळी शिक्षकांचे उपदान,अंशराशीकरण ,गटविमा, फंड रक्कम, निवड श्रेणी आदि विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

प्रमुख पाहुण्या गटशिक्षण अधिकारी शर्मिला शेंडे यांनी सांगितले की सेवानिवृत्त शिक्षकांचे कोणतेही प्रश्न पेण पंचायत समिती पर्यंत थांबणार नाहीत तर ते पुढे वाटचालीसाठी निश्चित पाठवणार असे सांगितले.

– स.रा.म्हात्रे

## मुरबाडमध्ये दरवळतो चंदनाचा सुगंध



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यात सातत्याने चंदन परिषदेच्या माध्यमातून हजारो चंदन वृक्षांची लागवड करण्यात आली असून चंदन शेतीकडे शेतकरी विशेष लक्ष देत आहेत.

निसर्ग अभ्यासक योगेंद्र बांगर यांच्या माध्यमातून पाच चंदन परिषदांचे आयोजन मुरबाड तालुक्यात करण्यात आले होते. अल्प दरात चंदन रोपे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली होती. चंदन शेती ही अत्यंत उपयुक्त व फायदेशीर शेती असून चंदन उत्पादक महासंघाचे श्रीकांत गोरे,अहिल्यानगर यांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना सातत्याने लाभते. बारा वर्षानंतर चंदना पासून उत्पन्न मिळते .

> चंदन परिषदेच्या माध्यमातून मी चंदन वृक्ष लागवड केली असून अत्यंत मेहनतीने चंदन वृक्ष जगवले आहेत. चंदन झाडे आपल्या शेतात जतन केली आहेत याचा आनंद होत आहे ,
> - गजानन भोईर, माजी सरपंच, शेलारी

तूर,जांभुळ,कडुलिंब यांच्या साथीने हे झाड वाढते. चंदनाचा गाभा किंवा खोड उपयुक्त असून त्याला किंमती भाव आहे.चंदन बाबतीत समाजात अनेक गैरसमज असून ते दूर करण्याचे काम चंदन परिषदांतून झाल्याची माहिती योगेंद्र बांगर यांनी दिली. लवकरच मुरबाड मध्ये भव्य चंदन परिषद होणार असून शेतकऱ्यांनी 9326058383 या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे .

# ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्याची संरक्षक भिंत कोसळली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणातील इतिहास कालीन दुर्गाडी किल्याची संरक्षक भिंत बुधवारी पहाटे झालेल्या अर्ध्या तासाच्या पावसात कोसळल्याची घटना घडली. या कामामध्ये कंत्राटदाराकडून मोठ्या प्रमाणात बेजबाबदारपणा झाल्याचे सांगत आमदार विश्वनाथ भोईर यांनी ठेकेदाराला फैलावर घेतले.



## भिंत कोसळल्या प्रकरणी आमदार विश्वनाथ भोईर यांनी ठेकेदाराला घेतले फैलावर

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या आरमारांची मुहूर्तमेढ कल्याणमधील दुर्गाडी किल्ला येथे रोवली. त्यामुळे ऐतिहासिक महत्त्व असलेले किल्ले दुर्गाडी हे लाखो शिवभक्तांचे श्रद्धा स्थान असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करोडो रू. खर्च करून किल्याची डागडुजी तसेच बुरूजाचे काम, कमानी चे काम सुरू आहे. अशातच किल्ल्याच्या समोरील बाजूस असलेली संरक्षक भिंत अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात बुधवारी पहाटे कोसळली. या पुरातन ऐतिहासिक ठेव्याच्या जबाबदारी आपल्या अंगावरून झटकण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभाग यांची जुपंली असल्याचे यानिमित्ताने समोर आल्याने शासन अंग असलेल्या दोन्ही विभागाची टोलावा टोली पाहता, जबाबदार कोण असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे.

तर ही माहिती मिळताच कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर आणि जिल्हाप्रमुख अरविंद मोरे या दोघांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच यावेळी उपस्थित असलेल्या संबंधित ठेकेदाराच्या अधिकाऱ्याला त्यांनी चांगलेच फैलावर घेतले. पाऊस सुरू असतानाही भिंत बांधायचे काम का सुरू ठेवले? एवढ्या मोठ्या प्रमाणात भिंत कोसळली आहे त्यात जीवितहानी झाली असती तर त्याला जबाबदार कोण? तसंच येत्या दोन दिवसात असलेल्या बकरी ईदनिमित्त मोठ्या प्रमाणावर मुस्लिम बांधव या ठिकाणी नमाज पडण्यासाठी येणार आहेत. त्यावेळी मोठी दुर्घटना झाली तर जबाबदारी कोण घेणार ? अशा संतप्त प्रश्नांची सरबत्ती आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी केली. तसेच आमदार विश्वनाथ भोईर यांनी या भिंतीच्या कामाच्या दर्जाबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

यासंदर्भात पी डब्ल्यू डी आणि पुरातत्त्व खातं हे एकमेकांकडे बोट दाखवत आहे. तर कंत्राटदार याठिकाणी यायलाही तयार नाहीये. लवकरात लवकर संबंधित ठेकेदार याठिकाणी उपस्थित झाला नाही तर आम्ही शिवसेना स्टाईलने त्या कंत्राटदाराला धडा शिकवू असा सज्जड दमही आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी दिला. यावेळी माजी नगरसेवक जयवंत भोईर, कासिफ तानकी, माजी परिवहन समिती सदस्य आणि शिवसेनेचे उपशहरप्रमुख सुनिल खारूक यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558




# सर्पदंशामुळे दोघांचा मृत्यू : शहापूर उपजिल्हा रुग्णालयाच्या आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : शहापूर तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेच्या ढिसाळपणामुळे व वेळेत उपचार न मिळाल्याने दोन निरपराध मुलांचे जीव गेले असून, संपूर्ण शहापूर तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. पेंढरघोळ येथील 14 वर्षीय प्रेम लहानू सदगीर आणि अल्याणी येथील 19 वर्षीय रोहिणी हरिश्चंद्र निमसे या दोघांचा सर्पदंशामुळे मृत्यू झाला. दोघांनाही वेळेवर आणि योग्य उपचार मिळाले असते, तर त्यांचा जीव वाचू शकला असता, अशी संतप्त भावना नागरिकांमधून व्यक्त होताना दिसत आहे.

पेंढरघोळ येथील प्रेम सदगीर हा काल संध्याकाळी 5 वाजेच्या सुमारास क्रिकेट खेळत असताना चेंडू आणण्यासाठी गेला असता त्याला विषारी सापाने दंश केला. पालकांनी तत्काळ त्याला शहापूर उपजिल्हा रुग्णालयात आणले . मात्र रुग्णालयात डॉक्टरांच्या उपचार प्रक्रियेतील हलगर्जीपणामुळे एक तास उपचार झाले नाहीत केवळ रक्त तपासणीवर वेळ घालवला गेला.

प्रेमचे पालकांनी स्वतः डॉक्टर व नर्स यांना वारंवार विनवण्या केल्या, मात्र कोणीही उपचारासाठी पुढे आले नाही. अखेर तोंडातून लाळ येऊ लागल्यावर आणि प्रकृती अत्यंत गंभीर झाल्यावर डॉक्टरांनी लक्ष दिले, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. त्याला ठाणे सिव्हिल रुग्णालयात हलविण्याचा निर्णय घेतला गेला, पण त्या दरम्यान त्याचा मृत्यू झाला. आणि आमचा एकुलता एक मुलगा आमच्या डोळ्यांसमोर तडफडून आम्हाला सोडून गेला असा टाहो त्यांनी त्यावेळी फोडला.तसेच अल्याणी गावातील रोहिणी हरिश्चंद्र निमसे (वय 19) हीला रात्री 3 वाजता झोपेत असताना मन्यार जातीच्या सापाने तिला दंश केला तिलाही तातडीने शहापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी प्राथमिक उपचार सुरु केले, मात्र ICU सुविधा आणि आवश्यक जीवनरक्षक साधनांची कमतरता असल्याने तिला ठाणे सिव्हिल



रुग्णालयात हलविण्यास सांगण्यात आले. मात्र वाटेतच तिचाही दुर्दैवी मृत्यू झाला.राणी ही आरमाईट कॉलेज, शहापूर येथे इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होती. तिच्या आकस्मिक निधनाने गावात नव्हे तर तालुक्यात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.या दोन्ही घटनामुळेआरोग्य यंत्रणेवरील लोकांचा विश्वास उडाला असून येथील लोकप्रतिनिधीना जाग येईल का? व रुग्णालयात सेवा सुविधा पुरविल्या जातील का असा प्रश्न विचारला जात आहे.

या दोन घटनांनी पुन्हा एकदा शहापूर तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेतील अपयश उघड झाले असून आहे. त्याठिकाणी तज्ञ डॉक्टर, प्रशिक्षित कर्मचारी, जीवनरक्षक उपकरणांची टंचाई दूर होईल का असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे आणि याबाबत रुग्णालयातील दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे मात्र या मतदार संघाचे आमदार दौलत दरोडा आणि खासदार सुरेश म्हात्रे गप्प का असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे आरोग्य सुविधा न देता केवळ इमारती उभ्या करणे म्हणजे केवळ दिखावाआहे का? जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि लोकप्रतिनिधींनी याची तातडीने गंभीर दखल घ्यावी आणि सुधारणा घडवून आणावी, अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून केली जात आहे. शेवटी एवढंच म्हणावं लागतं – शहापूर तालुक्यात आरोग्याच्या नावाखाली फक्त आश्वासने मिळतात, उपचार नाहीत. आणि त्यामुळे अजून किती बळी जातील याचा काही नेम नाही.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024